ePaper

# ‘राज ठाकरेंचं वर्तन तालिबानी पद्धतीचं’, सदावर्तेंचा हल्लाबोल!



| वर्ष - 8 | अंक - 262 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | शनिवार, दि. 19 एप्रिल 2025 | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- नेहल वढेराची दमदार खेळी!
- आयपीएलमध्ये कोण सामनावीर?
- ५० टक्के भारतीयांचा व्हिसा रद्द!
- मी कुणाचं नाव घेतलंच नाही


### काँग्रेस कार्यकर्ते रस्त्यावर : भाजपावाले ‘काँग्रेस भवना’ त घुसले !

# काँग्रेस-भाजपा मध्ये पुण्यामध्ये फुल्ल राडा!

## ‘सोनिया, राहुलला अटक करा’ घोषणांनी परिसरात प्रचंड तणाव

। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**‘नॅशनल हेरॉल्ड’ प्रकरणात दाखल झालेल्या आरोपपत्रात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची नावे आल्यानंतर संपूर्ण देशात काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून पुण्यात भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनीही आक्रमक भूमिका स्वीकारली. पुण्यात बालगंधर्व चौकात, काँग्रेस भवनासमोर दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठे घोषणायुद्ध होऊन प्रचंड राडा झाला.**




### काँग्रेस कार्यकर्त्यांनी लोकल अडवली




### ‘ईडी’वर काँग्रेसचा रोष..

‘ईडी’ कडून सोनिया आणि राहुल यांना देण्यात आलेल्या नोटिशीच्या निषेधार्थ युवक काँग्रेसने खडकी रेल्वे स्टेशनवर लोणावळा - पुणे लोकल ट्रेन अडवून आपला रोष व्यक्त केला. एकीकडे काँग्रेस कार्यकर्ते रस्त्यावर उतरले असताना दुसरीकडे भाजपाचे समर्थकही आक्रमक झाल्याचे दिसले.

### भाजपाने धरली ‘काँग्रेस भवना’ ची वाट

भाजपा कार्यकर्त्यांनी ‘काँग्रेस भवना’ ची वाट धरल्याने काँग्रेस आणि भाजपा समर्थक काही काळ समोरासमोर आले. घोषणाबाजीमुळे परिसरात तणाव निर्माण झाला. जंगली महाराज रस्त्यावर बालगंधर्व चौकात जोरदार राडा पाहायला मिळाला. या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता.

### हट्टी भूमिकेवर भाजपा ठाम..

काँग्रेस भवना’ मध्ये आम्ही जाणारच, राहुल गांधी - सोनिया गांधी यांना अटक करा, अशी हट्टी भूमिका भाजपा समर्थकांनी घेतली. तर, काँग्रेस समर्थकही काठ्या घेऊन रस्त्यावर उतरल्याचे दिसून आले. काँग्रेस कार्यकर्ते त्यांच्या नेत्यांच्या समर्थनार्थ तर भाजपाचे कार्यकर्ते त्यांच्या विरोधात घोषणा द्यायला लागल्यामुळे या परिसरात कानठळ्या बसवणारी घोषणाबाजी झाली.





### भाजपाचे युवा कार्यकर्ते आक्रमक !

‘नॅशनल हेरॉल्ड’ प्रकरणी संपूर्ण देशात भाजपा कार्यकर्ते आक्रमक झाले असून पुण्यात ‘काँग्रेस भवना’ च्या समोर भाजपा युवा मोर्चाकडून आंदोलन झाले. हे कार्यकर्ते आधी बालगंधर्व चौकात जमले, तर तिकडे ‘काँग्रेस भवना’ बाहेर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. बालगंधर्व रंगमंदिरापासूनच पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला

### भाजपा युवा कार्यकर्त्यांची धरपकड..

‘काँग्रेस भवना’ वर चाल करून निघालेल्या भाजपा युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी अडवले, त्यांची धरपकड सुरू केली. काँग्रेसने २००० कोटी रुपयांचा घोटाळा केला असून आता ‘फेक नॅरेटिव्ह’ पसरवण्यात येत आहे. त्यामुळे, सोनिया गांधी व राहुल गांधी यांना अटक करावी, अशी मागणी भाजपा समर्थकांनी केली आहे.

### काँग्रेसचे जोरदार प्रत्युत्तर..

काँग्रेस विरोधात ‘काँग्रेस भवना’ समोर भाजपाकडून आंदोलन करण्यात आल्यामुळे काँग्रेस कार्यकर्तेसुद्धा एकवटले आणि भाजपाच्या विरोधात आक्रमक झाले. ‘काँग्रेस भवना’ मध्ये काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते बसून होते. मात्र, पोलिसांनी भाजपाच्या काही समर्थकांना ताब्यात घेतल्यामुळे कोठेही बांका प्रसंग उद्भवला नाही.

### ‘वक्फ’ चा दणका बसल्याने भाजपा सैरभैर !

संसदेच्या दोन्ही सभागृहांनी मंजुरी दिलेल्या आणि नंतर राष्ट्रपतींनी सही केलेल्या वक्फ बोर्ड कायद्याला सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिल्यामुळे भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व काहीसे सैरभैर झाले आहे. त्यातच ‘नॅशनल हेरॉल्ड’ प्रकरणी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्यावर आरोपपत्र दाखल झाल्याने भाजपाच्या नेत्यांना मोठी ताकद मिळाली आहे. तर काँग्रेसचे नेते मात्र अजूनही ‘ईडी’ च्या डावपेचात आणि ईडीवर आरोप करण्यातच धन्यता मानत आहेत. तिकडे पश्चिम बंगालमध्ये वक्फ बोर्ड कायद्यावरून तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी सुरू केलेला हिंसाचार तसाच कायम आहे आणि हिंदू कुटुंबांना त्या ठिकाणी टार्गेट केले जात आहे. तेथील हिंदूंच्या मदतीला आता बिहार आणि उत्तर प्रदेशातून बजरंग दलाचे हजारो कार्यकर्ते रवाना झाले आहेत, त्यामुळे तो संघर्ष पेटण्याचीच चिन्हे आहेत !

ePaper

## ‘राज ठाकरेंचं वर्तन तालिबानी पद्धतीचं’, सदावर्तेंचा हल्लाबोल!

| वर्ष - 8 | अंक - 262 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)



### आतील पानांत

- नेहल वढेराची दमदार खेळी!
- आयपीएलमध्ये कोण सामनावीर?
- ५० टक्के भारतीयांचा व्हिसा रद्द!
- मी कुणाचं नाव घेतलंच नाही

www.mahaenews.com | शनिवार, दि. 19 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राज्यात तिसऱ्या आघाडीचा प्रयोग

# महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा भूकंप?

## विरोधी पक्षाची कमतरता दूर करण्यासाठी तीन बडे नेते एकत्र

। मुंबई / पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**महाराष्ट्राचे राजकारण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर बदलले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील बंडखोरीनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला जबरदस्त यश मिळाले. या निवडणुकीत महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांना मोठा फटका बसला. तिन्ही पक्षांना मिळूनही ५० आमदारांचे संख्याबळ गाठता आले नाही. राज्यात सत्ताधारी पक्षाविरोधात विरोधकांची धार कमी होत आहे. त्यामुळे राज्यातील तीन बड्या नेत्यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. त्या तिघांनी त्यासाठी पुण्यात येत्या रविवारी ‘युवा संघर्ष निर्धार परिषद २०२५’चे आयोजन केले आहे. राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर यांच्या एकत्रित आघाडीचा पुण्यात मेळावा होणार आहे. येत्या रविवारी ‘युवा संघर्ष निर्धार परिषद २०२५’ होणार आहे. त्यात सत्ताधाऱ्यांविरोधात रणशिंग ही आघाडी फुंकणार आहे.**



### कोणते तीन नेते एकत्र

राज्यात महाविकास आघाडी विरोधात आहे. शिवसेना उबाठा, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस हे तीन पक्ष महाविकास आघाडीत आहे. परंतु या तिन्ही पक्षांना विधानसभा निवडणुकीत मोठे संख्याबळ मिळवता आले नाही. त्यामुळे विरोधकांची धार कमी झाली आहे. आता विरोधी पक्षांची स्पेस भरून काढण्याच्या निर्धाराने तीन बडे नेते एकत्र येणारे आहेत. राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर यांची एकत्रित आघाडी सत्ताधाऱ्यांसमोर आव्हान निर्माण करणार आहे.

### युवा संघर्ष निर्धार परिषदचे आयोजन

राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर यांच्या एकत्रित आघाडीचा पुण्यात मेळावा होणार आहे. येत्या रविवारी ‘युवा संघर्ष निर्धार परिषद २०२५’ होणार आहे. त्यात सत्ताधाऱ्यांविरोधात रणशिंग ही आघाडी फुंकणार आहे. त्याची चुणूक त्या आघाडीच्या टॅगलाईनमधून दिसून आली. या परिषदेत सत्ताधाऱ्यांना तिन्ही नेते घेरण्याचा प्रयत्न करणार आहे. खोट्या आश्वासनांना कंटाळलेल्या तरुणांचा बुलंद निर्धार.! या टॅगलाईन खाली “युवा संघर्ष निर्धार परिषद २०२५” चे आयोजन राज्यात करण्यात आले आहे. राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर या परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एक नवी आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. ही आघाडी सत्ताधारी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादीसमोर आव्हान उभे करणार का? हे येत्या काळातच दिसून येणार आहे.

### 20 एप्रिल रोजी नव्या आघाडीवर शिक्कामोर्तब?

महाराष्ट्राचे राजकारण युती आणि आघाडीवर सुरु झाले आहे. राज्यात शिवसेना-भाजप युती होती. त्यानंतर त्या युतीमध्ये अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आल्यानंतर महायुती झाली. महायुतीला आव्हान देण्यासाठी शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा आणि काँग्रेस यांची महाविकास आघाडी निर्माण झाली. विधानसभा निवडणुकीपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू राजरत्न आंबेडकर यांनी मनोज जरांगे यांना सोबत घेऊन

### तिसरी आघाडी प्रबळ विरोधक ठरणार का?

राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांचा २० एप्रिल रोजी वाढदिवस आहे. त्यानिमित्त बच्चू कडू मोठा निर्णय घेणार आहे. राष्ट्रीय समाज पक्षाने पुण्यात युवा संघर्ष निर्धार परिषद भरवली आहे. त्यावेळी महादेव जानकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मेळाव्याच आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित राहणार आहेत. या दिवशी राजू शेट्टी आणि बच्चू कडू मोठा निर्णय जाहीर करणार आहेत. राज्यात तिसरी आघाडी निर्माण होण्याची शक्यता राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर या तिन्ही नेत्यांच्या माध्यमातून झाली आहे. हे तिन्ही नेते एकत्र येत मोठा निर्णय घेणार आहे, अशी माहिती बच्चू कडू यांनी दिली. त्यासाठी त्यांनी फुले वाड्यात येण्याचे आवाहन सर्व कार्यकर्त्यांना केले आहे. यामुळे २० एप्रिल रोजी राज्याच्या राजकारणाचे लक्ष फुले वाडा राहणार आहे. पुणे शहरात २० एप्रिल रोजी ‘युवा संघर्ष निर्धार परिषद २०२५’ होणार आहे. खोट्या आश्वासनांना कंटाळलेल्या तरुणांचा बुलंद निर्धार.! या टॅगलाईन खाली परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या मेळाव्यातून राज्यातील सत्ताधाऱ्यांना टीकेचे लक्ष केले जाणार आहे.

# बाबा भिडे पूल दीड महिना बंद!

## डेक्कन मेट्रो स्टेशन परिसरात पादचारी पूल उभारण्याचे काम सुरु

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**डेक्कन जिमखाना आणि शहरातील मध्यवर्ती पेठांचा भाग जोडणारा बाबा भिडे पूल २१ एप्रिलपासून ६ जूनपर्यंत वाहतुकीसाठी पूर्ण बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे मेट्रोच्या डेक्कन जिमखाना स्टेशनच्या कामासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शुक्रवारी सकाळीच हा पूल वाहतुकीसाठी अचानक बंद करण्यात आल्याने नागरिकांचा मोठा गोंधळ उडाला. त्यामुळे तूर्तास दोन दिवस हा पूल वाहतुकीसाठी सुरू ठेवण्यात येणार आहे.**



मध्यवर्ती भागातील बाबा भिडे पूल बंद राहणार असल्याचा फलक शुक्रवारी सकाळी या ठिकाणी लावण्यात आला आणि पुलाच्या दोन्ही बाजूंना बॅरिकेट लावल्या. या पुलाचा वापर हजारो नागरिक करतात. नागरिकांना कुठलीही कल्पना न देता पूल अचानक बंद करण्यात आल्याने गोंधळ उडाला. पूल बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती मेट्रो प्रशासनाने महापालिकेला दिली नव्हती. परस्पर पूल बंद केल्याने अनेकांनी महापालिकेतील अधिकाऱ्यांना चौकशीसाठी फोन केल्यानंतर मेट्रोने हा पूल वाहतुकीसाठी बंद केल्याचे समोर आले.डेक्कन जिमखाना मेट्रो स्टेशनजवळ मेट्रोला पुलाच्या गर्डरचे काम करायचे आहे. त्यासाठी मेट्रो प्रशासनाने भिडे पूल वाहतुकीसाठी बंद ठेवावा, अशी परवानगी पोलिसांच्या वाहतूक शाखेकडे मागितली होती. वाहतूक शाखेने ही परवानगी दिली आहे. मात्र, यामध्ये पुणे मेट्रो प्रशासनाने आणि पोलिसांच्या वाहतूक शाखेने महापालिकेला याची कल्पना न दिल्याने शुक्रवारी सकाळी अचानक हा पूल वाहतुकीसाठी बंद केल्यामुळे गोंधळ उडाला. नागरिकांनी महापालिकेकडे विचारणा केल्यानंतर पालिका अधिकाऱ्यांनी मेट्रोच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. कोणतीही पूर्वकल्पना न देता अशा पद्धतीने भिडे पूल वाहतुकीसाठी बंद केल्यास गोंधळ उडेल, त्यामुळे पुढील दोन दिवस याबाबत जनजागृती करून पूल बंद करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेतील अधिकाऱ्यांनी दिली. पुलावर लावण्यात आलेले बॅरिकेट नंतर काढून टाकण्यात आले आणि पुलावरून वाहतूक पूर्ववत झाली. डेक्कन भागातील भिडे पूल बंद केल्यानंतर नागरिकांनी छत्रपती संभाजी पूल (लकडी पूल), विठ्ठल रामजी शिंदे पूल (बालगंधर्व येथील पूल) आणि काकासाहेब गाडगीळ पूल (झेड ब्रिज) या पर्यायी पुलांचा वापर करावा, असे आवाहन मेट्रोतर्फे करण्यात आले आहे. डेक्कन मेट्रो स्टेशन परिसरात पादचारी पूल उभारणीचे काम गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. या कामासाठी भिडे पुलाच्या पश्चिम बाजूला मोठ्या प्रमाणावर खोदकाम सुरू करण्यात आले आहे. या काममध्ये वाहतुकीचा अडथळा होऊ नये, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी बाबा भिडे पूल काही दिवस वाहतुकीसाठी बंद ठेवण्याचा निर्णय मेट्रो प्रशासनाने घेतला आहे. पूल बंद केल्यानंतर मेट्रो प्रशासनाशी संपर्क साधण्यात आला. नागरिकांना याबाबत पूर्वकल्पना देण्याची सूचना करण्यात आली. त्यानुसार दोन दिवस पूल सुरू ठेवण्यात येणार आहे. पूल बंद ठेवण्यास मेट्रोला पोलिसांनी परवानगी दिली आहे. मध्यवर्ती भागातील बाबा भिडे पूल बंद राहणार असल्याचा फलक शुक्रवारी सकाळी या ठिकाणी लावण्यात आला आणि पुलाच्या दोन्ही बाजूंना बॅरिकेट लावल्या. या पुलाचा वापर हजारो नागरिक करतात. नागरिकांना कुठलीही कल्पना न देता पूल अचानक बंद करण्यात आल्याने गोंधळ उडाला. पूल बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती मेट्रो प्रशासनाने महापालिकेला दिली

### नागरिकांचा मोठा गोंधळ उडाला

नव्हती. परस्पर पूल बंद केल्याने अनेकांनी महापालिकेतील अधिकाऱ्यांना चौकशीसाठी फोन केल्यानंतर मेट्रोने हा पूल वाहतुकीसाठी बंद केल्याचे समोर आले.डेक्कन जिमखाना मेट्रो स्टेशनजवळ मेट्रोला पुलाच्या गर्डरचे काम करायचे आहे. त्यासाठी मेट्रो प्रशासनाने भिडे पूल वाहतुकीसाठी बंद ठेवावा, अशी परवानगी पोलिसांच्या वाहतूक शाखेकडे मागितली होती.

# ‘संस्कृता’ दालनाद्वारे विद्यार्थिनींच्या उद्योजकतेला चालना

## एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या गृहविज्ञान महाविद्यालयाचा पुढाकार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या गृहविज्ञान महाविद्यालयातर्फे विद्यार्थिनींच्या उद्योजकतेला चालना देण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. या अंतर्गत विद्यार्थिनींनी तयार केलेली बेकरी उत्पादने, कापडे, दागिने अशी विविध उत्पादने ‘संस्कृता’ या दालनाद्वारे विक्रीसाठी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित असून, येत्या शैक्षणिक वर्षात या दालनाचे उद्घाटन करण्याचे नियोजन आहे.**




‘संस्कृता’ दालनामध्ये न्यूट्रिशन अँड डायेटेटिक्स, फूड सायन्स अँड क्वालिटी कंट्रोल, टेक्सटाईल सायन्स अँड अपॅरेल डिझाईन, ह्युमन डेव्हलपमेंट, इंटिरियर डिझाईन, ह्युमन इकॉलॉजी अँड कन्झ्युमर सर्व्हिसेस अशा सर्व शाखांतील उत्पादने या दुकानात उपलब्ध करून दिली जाणार आहेत. ‘संस्कृता’ या दालनाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना त्यांचे कौशल्य दाखवण्याची, नैसर्गिक आणि पारंपरिक उत्पादने मांडण्याची संधी मिळणार आहे. गृहविज्ञान महाविद्यालयात विद्यार्थिनी अन्न व पोषणशास्त्र शिकतात. त्यामुळे प्रकल्पांसाठी त्या नावीन्यपूर्ण उत्पादने तयार करतात. ही उत्पादने महाविद्यालयाच्या पलीकडे सर्वसामान्य नागरिकांपर्यंतही पोहोचाव्यात, विद्यार्थिनींना उद्योजकतेचे पैलू समजावेत, अशी कल्पना आहे. त्यामुळे कर्वे रस्त्यालगत दालन सुरू करण्याचे प्रस्तावित आहे, असे प्रा. चव्हाण यांनी सांगितले.प्रा. चव्हाण म्हणाले, ‘गृहविज्ञान अभ्यासक्रम हा केवळ स्वयंपाक आणि खाद्यपदार्थांशी संबंधित नाही. तर, त्यात विद्यार्थिनींमध्ये उपयुक्त कौशल्य आणि त्यांना सक्षम करणारा शास्त्रीय अभ्यासक्रम आहे. त्यामुळे विद्यार्थिनी प्रत्येक उत्पादनासाठी आराखडा तयार करतील, डिझाईन बनवतील, खर्चाचा अभ्यास करतील, बाजारपेठेतील स्पर्धेचे विश्लेषण करून उत्पादनांच्या किमती निश्चित करतील. तसेच, आगाऊ मागणी नोंदवून घेऊन त्याची पूर्तताही करतील.

### प्रत्येक उत्पादनासाठी आराखडा तयार

या सर्व व्यवहाराचे बारकाईने लेखापरीक्षण करून ग्राहकांना काय आवडते, काय आवडत नाही हेही त्यांना समजेलफूड सायन्स अँड क्वालिटी कंट्रोल, टेक्सटाईल सायन्स अँड अपॅरेल डिझाईन, ह्युमन डेव्हलपमेंट, इंटिरियर डिझाईन, ह्युमन इकॉलॉजी अँड कन्झ्युमर सर्व्हिसेस अशा सर्व शाखांतील उत्पादने या दुकानात उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

## चिंचवड येथील क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे लोकार्पण

# चापेकर बंधुंचे स्मारक संस्कार, देशभक्तीचे केंद्र ठरेल!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

### पंतप्रधानांकडून शुभेच्छा!

चापेकर स्मारकाच्या लोकार्पण कार्यक्रमामध्ये देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा शुभेच्छा संदेश असणारी चित्रफीत यावेळी दाखवण्यात आली. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की, 'क्रांतीवीर चापेकर बंधुंचा इतिहास हा आपल्या स्वातंत्र्य संग्रामाच्या तेजस्वी आणि प्रेरणादायी अध्यायांपैकी एक आहे. त्यांनी दाखवलेली राष्ट्रभक्ती, अपार साहस आणि बलिदान यामुळे देशप्रेमाला नव्या अर्थाने समृद्धी दिली. त्यांच्या स्मृतीस समर्पित हे राष्ट्रीय संग्रहालय केवळ एक स्मारक नाही, तर ते आपल्या गौरवशाली इतिहासाशी भावनिक नाते जोडणारं केंद्र आहे.

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**हुतात्मांच्या कार्यातून देशभक्तीची प्रेरणा मिळत असते. चापेकर बंधु अशाच हुतात्मांपैकी एक होते. स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यांचे कार्य चापेकर स्मारकाच्या माध्यमातून नागरिकांसमोर येणार असून हे केंद्र खऱ्या अर्थाने देशभक्तीचे संस्कार देणारे ठरेल. हे स्मारक उभारताना तंत्रज्ञानाचा अतिशय उत्तमरित्या वापर करण्यात आला असून ते केवळ पिंपरी चिंचवडसाठी मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारे ठरेल,' असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आणि क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे लोकार्पण व राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज चिंचवड गावातील चापेकर वाडा येथे झाला. यावेळी त्यांनी स्मारकाची पाहणी केली. त्यानंतर चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार हे होते. कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, अमित गोरखे, क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, पुणे विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ.योगेश म्हसे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, चापेकर यांचे वंशज प्रशांत चापेकर, प्रतिभा चापेकर, स्मिता चापेकर, चेतन चापेकर, मानसी चापेकर, जान्हवी जोशी यांची विशेष उपस्थिती होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चापेकरांच्या वंशजांचा सन्मान यावेळी करण्यात आला. महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम, सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उपायुक्त अण्णा बोदडे, पंकज पाटील, सहाय्यक आयुक्त अमित पंडित, चापेकर स्मारक समितीचे सचिव ॲड. सतीश गोरडे आदी देखील उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले, 'चापेकर वाडा येथे उभारण्यात येत असलेले स्मारक अतिशय सुंदर आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या स्मारकात चापेकर बंधू यांच्या जीवनाशी संबंधित एकूण १४ प्रसंग आहेत,' असे सांगतानाच चापेकर बंधुंनी केलेल्या रँडच्या वधाबद्दल सविस्तर माहितीही यावेळी त्यांनी दिली.

'छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांची प्रेरणा चापेकर बंधुंनी घेतली होती. चापेकर वाडा येथे उभारण्यात आलेले स्मारक हे लवकरच राष्ट्रीय स्मारक होणार आहे. भारताचा सूवर्णमय इतिहास या स्मारकात पाहण्यास मिळेल,' असेहीमुख्यमंत्रीफडणवीसम्हणाले.

## उद्योग शिल्लक नसणाऱ्यांकडून भाषेचा विरोध - अजित पवार

### राज ठाकरे यांच्यावर नाव न घेता टीका

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**मराठी मातृभाषा आहेच त्याबद्दल दुमत नाही त्याबद्दल प्रेम जिव्हाळा आहे . मराठी भाषा टिकलीच पाहिजे मोदी सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला. जगात इंग्रजी भाषा बोलली जाते पण महाराष्ट्रात राहायचे असेल तर मराठी आलेच पाहिजे. तिन्ही भाषेला महत्व पण मातृभाषेला नंबर एकचे स्थान आहे .असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार चिंचवड येथे म्हणाले. ज्यांना काही उद्योग शिल्लक नाही ते हिंदी भाषेचा विरोध करतात असेही मत पवार यांनी नोंदविले.**

पिंपरी चिंचवड पालिकेच्या वतीने आणि क्रांतीवीर चापेकर स्मारक समितीच्या सहकार्याने उभारण्यात आलेल्या क्रांतीवीर चापेकर स्मारकाचे लोकार्पण व राष्ट्रीय संग्रहालयाच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर अजित पवार बोलत होते.

अजित पवार म्हणाले, ज्यांना काही उद्योग शिल्लक नाही ते हिंदी भाषेचा विरोध करत आहे. हिंदी आपली राष्ट्रभाषा आहे, मराठी आपली ही मातृभाषा आहे. तसेच इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. तीन्ही भाषा आपल्यासाठी महत्वाच्या आहेत. त्यामुळें हिंदीला विरोध करण्याचे काही कारण नाही, कारण की मराठी आपली मातृभाषा आहे. काही महिन्यांपूर्वी केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे,



त्यामुळे ज्यांच्याकडे काही उद्योग नाही ते हिंदी भाषेला विरोध करत आहेत अशी टीका अजित पवार यांनी नाव न घेता राज ठाकरे यांच्यावर केली.

नाशिक दंगली प्रकरणात आम्ही कुठल्या पार्टी चा कार्यकर्ता म्हणून केस दाखल करत नाही, जे दोषी असतील त्यांच्यावर योग्य कारवाई करत आहोत. कुणालाही सोडले जाणार नाही असा इशारा अजित पवार यांनी दिला आहे.

बीडचे निलंबित पीएसआय अभिजीत कासले यांनी आरोप केले त्याची चौकशी केली जाईल आणि त्याच्या नंतर योग्य ती कारवाई केली जाईल अशी माहिती अजित पवार यांनी दिली आहे.



## भूमिका

# परीक्षांमध्ये वर्णनात्मक पद्धतीला पर्याय नाही

**राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षांमध्ये वर्णनात्मक लिखाणाऐवजी, बहुपर्यायी प्रश्न आणि वस्तुनिष्ठ प्रश्न ही पद्धत असावी अशी मागणी केली जात आहे. वर्णनात्मक लिखाण विद्यार्थ्यांना वेळ आणि ऊर्जा खर्च करण्यास भाग पाडते, तसेच ते मूल्यमापनात जास्त वेळ घेते, असे काही विद्यार्थी आणि अभ्यासकांचे मत आहे. पण असे वाटणे का चुकीचे आहे हा मुद्दा समजून घेण्यासाठी एका काल्पनिक परिस्थितीकडे पाहू**

समजा की सरकारी धोरणाचा मसुदा तयार करताना धोरण मांडणीची सखोल गरज असताना, नव्याने निवड झालेल्या अधिकाऱ्यांना "विकास धोरणाचा उद्देश काय?" हा प्रश्न विचारला गेला. त्यांना उत्तरादाखलअसे पर्याय दिले.

वरिष्ठांकडून असे का केले ही विचारणा झाल्यावर, संबंधित महाशय म्हणतात "वर्णनात्मक लिखाण येत नाही, एमसीक्यू फॉर्मेटच जमतो! आता या काल्पनिक परिस्थितीतील अतिशयोक्ती सोडून दिली तरी 'राज्य स्तरावर स्पर्धा परीक्षेत वर्णनात्मक लिखाण नको' ही मागणी अवास्तव आहे हे नक्की. वर्णनात्मक लिहीता येत नाही, कुणी कधी शिकवलेच नाही, इ. समस्या असतील तर त्यावर १००% उपाय आहेत. परंतु आम्हाला येतच नाही, तर तुम्ही तशी परीक्षाच ठेऊ नका ही मागणी अशैक्षणिक आणि



वरील काल्पनिक उदाहरण लक्षात घेतल्यास, अव्यवहार्यही आहे. स्पर्धा परीक्षा हा आजच्या युगातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे, जो विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची, विचारांची खोली आणि विश्लेषण क्षमता तपासतो. या परीक्षांमध्ये वर्णनात्मक (DESCRIPTIVE) उत्तरांचे महत्त्व मोठे आहे, कारण ही उत्तरे केवळ गुण देण्यापुरती मर्यादित नसतात, तर त्या उत्तरांमधून परीक्षार्थीची तर्कशक्ती, सखोल विचारसरणी आणि सुसंगत मांडणी तपासता येते. वर्णनात्मक उत्तरांद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञानाची व्याप्ती आणि गाभा मांडता येतो. एखाद्या प्रश्नावर विस्ताराने आणि व्यवस्थित उत्तर देताना विद्यार्थ्यांची विश्लेषणात्मक क्षमता, मतप्रदर्शनाची पद्धत आणि आकलनशक्ती कळून येते. हे केवळ पाठांतर न करता, विषयाचा सखोल अभ्यास करूनच शक्य होत असते.

उत्तरांची मांडणी सुसंगत, सुस्पष्ट आणि मुद्देसूद असल्यास लेखनशैली सुधारण्यासही मदत होते, जी विविध प्रशासकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांत उपयुक्त ठरते. वर्णनात्मक उत्तरे ही परीक्षार्थीच्या वैचारिक स्पष्टतेचे आणि व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असते. प्रश्नावर दिलेले उत्तर केवळ पुस्तकातील माहितीवर आधारित न राहता, त्या विषयाविषयी परीक्षार्थीच्या दृष्टीकोनातून सखोल विचार मांडणे आवश्यक असते.

वर्णनात्मक लिखाण कौशल्यात वाचन महत्त्वपूर्ण आहे. विषयाची सखोल समज, तर्कशक्ती, विश्लेषण क्षमता आणि मांडणीची शैली तयार होण्यासाठी वाचनाची सवय अत्यावश्यक ठरते. पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके आणि संशोधन लेख वाचल्याने इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, विज्ञान, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांची व्यापक माहिती मिळते. ही माहिती परीक्षांमध्ये विविध प्रश्नांची समर्पक आणि तर्कसंगत उत्तरे देण्यास मदत करते.वाचनामुळे केवळ पाठ्यपुस्तकांतील माहिती मिळते असे नाही, तर विविध संदर्भ आणि दृष्टिकोनांमधून एखाद्या विषयाचे अनेक पैलू समजतात. उदाहरणार्थ, एखाद्या सामाजिक समस्येवर उत्तर देताना इतिहास, वर्तमान घटनाक्रम आणि जागतिक संदर्भ जोडल्यास उत्तर अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठरते. नियमित वाचनामुळे व्यक्तीची विश्लेषण क्षमता आणि तर्कशक्ती वाढते. विविध दृष्टिकोन, लेखकांची मते आणि सामाजिक मुद्द्यांची सखोल चिकित्सा वाचनाद्वारे समजते. या ज्ञानाचा वापर करून परीक्षार्थी प्रश्नांची मांडणी प्रभावीपणे करू शकतो. वाचनाची सवय असलेल्या विद्यार्थ्यांना प्रश्न वाचून त्याचा गाभा पटकन समजतो आणि अपेक्षित उत्तराची दिशा ठरवता येते. यामुळे वेळेचे योग्य नियोजन होते आणि परीक्षेत अधिक गुण मिळवणे शक्य होते.परीक्षार्थीच्या यशासाठी विशिष्ट तंत्र, ट्रिक्स आणि शॉर्टकट् शिकवणाऱ्या कोचिंग क्लासेसची मागणी वाढली आहे. अशा कोचिंग क्लासेसकडे वर्णनात्मक लिखाण कसे करायचे याचे मार्गदर्शन करणारे तज्ञ असतीलच याची काय खात्री? तसे असल्यास 'वर्णनात्मक पध्दत चुकीची हे पसरविले जाते' हे एका परिचयातील शिक्षकांचे मत!

## प्रासंगिक »

### 'वक्फ' करता वफा

***कोणत्याही धर्मातील पारंपरिक चालीरीतींप्रमाणे वक्फ व्यवस्थापनातही कालानुरूप बदल होणे गरजेचे आहे. पण त्यासाठी सरकारचे इरादे नेक आणि तेवढ्यापुरतेच हवेत...***

'वक्फ' सुधारणा विधेयक संसदेत मंजूर झाल्यानंतर आणि त्यास तत्परतेने राष्ट्रपतींची मंजुरीही मिळाल्यानंतर 'लोकसत्ता' संपादकीयात ("वक्फ'ने किया...', ४ एप्रिल) या कायद्यातील काही मुद्द्यांच्या वैधतेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. ते मुद्दे बुधवारपासून सर्वोच्च न्यायालयाच्या कचाट्यात सापडले आणि संयुक्त संसदीय समिती, लोकसभा, राज्यसभा, राष्ट्रपती इत्यादींनी मंजूर केलेल्या कायद्यातील काही तरतुदींस हंगामी स्थगिती दिली जात असल्याची नामुष्की सहन करण्याची वेळ केंद्र सरकारवर आली. या कायद्यास संपूर्ण स्थगिती देऊ नये यासाठी सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्या. संजय कुमार आणि न्या. केव्ही विश्वनाथन यांच्या पीठासमोर केंद्राच्या वतीने महाधिवक्ता तुषार मेहता यांनी "आगामी सात दिवस 'वक्फ'बाबत 'जैसे थे' परिस्थिती राखली जाईल'.

**शासन योजना तयार करते, परंतु या योजनांच्या अंमलबजावणीचा मार्ग महसूल प्रशासनाच्या माध्यमातून प्रशस्त व शिस्तबद्ध होत असतो. ज्याप्रमाणे आपल्या संपूर्ण शरीराचे संतुलन राखण्याचे काम आपल्या पाठीचा कणा करत असतो त्याप्रमाणे शासन आणि जनता यांच्यातील संतुलन राखणारा कणा म्हणून महसूल विभाग कार्य करतो.**

# जनताकेंद्री विचार नव्हे, स्वकेंद्री 'महसूल'!

पण जर शरीराच्या एखाद्या अंगाने आपल्याच 'महसूला'चा विचार केला तर पाठीचा कणा ताठ असूनही वाढत्या आजारास रोखू शकत नाही. तसा प्रकार राज्याच्या बाबतीत होऊ पाहत आहे. महसूल मंत्री एकीकडे आपल्या सुयोग्य कार्यपद्धतीबाबत अधिकाऱ्यांकडून स्वकौतुकाचे ढोल वाजवून घेत आहेत, पण सत्य परिस्थिती वेगळीच आहे. महाराष्ट्रात नागपूर, अमरावती, मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर असे सात महसूल विभाग आहेत. तर मुंबई व ठाणे या महसूल विभागांना एकत्र करून कोकण हा एकच प्रशासकीय विभाग केल्याने राज्यात सहा प्रशासकीय विभाग आहेत. प्रत्येक प्रशासकीय विभागासाठी महाराष्ट्र शासनातर्फे विभागीय आयुक्त नेमला आहे. महाराष्ट्रामध्ये एकूण सहा प्रशासकीय विभाग आहेत, जे महसूल प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. पुणे विभाग हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा विभागआहे. महाराष्ट्र राज्याच्या विकासासाठी वार्षिक योजना तयार



करण्याची जबाबदारी या विभागावर आहे. मंत्रालयाचे नेतृत्व कॅबिनेट स्तरावरील मंत्री करतात. तहसीलदार आणि नायब तहसीलदार हे महसूलप्रशासनातील प्रमुख अधिकारी आहेत आणि सहायक जिल्हाधिकारी द्वितीय श्रेणीचे अधिकार वापरतात. महसूल अधिकाऱ्यावर केंद्र आणि राज्य सरकारच्या सर्व कार्यालये आणि आस्थापने, अर्धसरकारी, खाजगी कंपन्या आणि व्यक्तींकडून व्यवसाय कर निश्चित करणे आणि गोळा करणे ही जबाबदारी असते. आर्थिक संसाधनांचे व्यवस्थापन करण्यात महसूल विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. कर संकलन आणि प्रशासन, प्रत्यक्ष कर ,आयकर, संपत्ती कर आणि अप्रत्यक्ष कर जीएसटी, सीमाशुल्क, उत्पादन शुल्क दोन्ही आकारणी आणि संकलन करण्याची जबाबदारी या विभागाची आहे. महाराष्ट्रातील महसूल विभाग सहा प्रशासकीय विभागात कार्य करत. कोकण विभाग: मुख्यालय – मुंबई, जिल्ह्यांची संख्या – ७ (पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) पुणे विभाग: मुख्यालय – पुणे, जिल्ह्यांची संख्या -५ (पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर) नाशिक विभाग: मुख्यालय – नाशिक, जिल्ह्यांची संख्या – ५ (नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, जळगाव) छत्रपती संभाजीनगर विभाग: मुख्यालय – छत्रपती संभाजीनगर, जिल्ह्यांची संख्या – ५ (छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली) अमरावती विभाग: मुख्यालय – अमरावती, जिल्ह्यांची संख्या – ५ (अमरावती, बुलढाणा, वाशिम, अकोला, यवतमाळ) नागपूर विभाग: मुख्यालय – नागपूर, जिल्ह्यांची संख्या – ५ (नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया) या माध्यमातून शासनाचा महसूलविभाग कार्य करतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# नकली आवाज काढणे हा पोरकटपणा!

## बाळासाहेबांचा आवाज काढण्यापेक्षा विचार आचरणात आणा



### भ्रष्टाचारी सरकार आम्ही गाडले

त्यांनी काँग्रेसची युती केली. त्यांचे त्यावेळचे भ्रष्टाचारी सरकार आम्ही गाडले. त्याचा राग त्यांना आल्याने ते सतत माझ्यावर, माझ्या दाढीवर टीका करत असतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही राष्ट्र विचाराची संघटना आहे, त्यालाही नावे ठेवतात. निवडणुकीत लोक बरोबर राहिले नाहीत त्यामुळे त्यांनी शंभर जागा लढवून त्यांना फक्त २० जागा मिळाल्या आणि आम्ही ८० जागा लढवून ६० जागा जिंकल्या. त्यामुळे खरी शिवसेना कोणाची आहे हे आता लोकांना कळून चुकले आहे.ब्रिटिशांच्या नंतर आमच्या युती सरकारने नवीन महाबळेश्वर प्रकल्प हाती घेतला आहे. आम्ही आता येथे नव्याने पर्यटनस्थळ उभारत आहोत.

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ह्याापोटी गारगोटी ही म्हण सध्या महाराष्ट्रात खरी ठरली आहे. बाळासाहेबांचा नकली आवाज काढणे हा पोरकटपणा आहे. नकली आवाज काढून बाळासाहेबांचे विचार आचरणात येत नसल्याचा आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे. दरे (ता. महाबळेश्वर) गावी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी भाजपाशी केलेली युती, नवीन महाबळेश्वर प्रकल्प, मुनावळे येथील आंतरराष्ट्रीय जलतरण प्रकल्प, मुंबई येथील अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक या विषयावर आपले मत व्यक्त केले.**

शिवसेना आणि भाजपची वैचारिक युती आहे. ही युती तोडण्याचे पाप त्यांनी केले होते. मुळात बाळासाहेबांनीच शिवसेना आणि भाजपाची युती केली होती. ती अविचाराने त्यांनी तोडली होती. ती युती आम्ही पुन्हा केली. बाळासाहेबांनी जे जे विचार देशाच्या संरक्षणासाठी आणि समाज व्यवस्थेसाठी मांडलेले होते ते सगळे मुद्दे, विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी प्रत्यक्षात आणले आहेत. त्यांनी राम मंदिर बांधले, ३७० कलम रद्द केले, असे अनेक निर्णय जे बाळासाहेबांना अपेक्षित होते ते भाजपाचे नेतृत्वाने घेतले आहेत. त्यामुळे आम्ही मूळ युती बरोबर गेलो आहोत.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, २०१९ मध्ये स्वतःचा वैयक्तिक स्वार्थ खुर्चीसाठी बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्व आणि विचार सोडले. त्यांनी काँग्रेसची युती केली. त्यांचे त्यावेळचे भ्रष्टाचारी सरकार आम्ही गाडले. त्याचा राग त्यांना आल्याने ते सतत माझ्यावर, माझ्या दाढीवर टीका करत असतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही राष्ट्र विचाराची संघटना आहे, त्यालाही नावे ठेवतात. निवडणुकीत लोक बरोबर राहिले नाहीत त्यामुळे त्यांनी शंभर जागा लढवून त्यांना फक्त २० जागा मिळाल्या आणि आम्ही ८० जागा लढवून ६० जागा जिंकल्या. त्यामुळे खरी शिवसेना कोणाची आहे हे आता लोकांना कळून चुकले आहे.ब्रिटिशांच्या नंतर आमच्या युती सरकारने नवीन महाबळेश्वर प्रकल्प हाती घेतला आहे. आम्ही आता येथे नव्याने पर्यटनस्थळ उभारत आहोत. येथील निसर्ग संपदेचे संरक्षण केले जाईल. अतिशय अत्याधुनिक पद्धतीने हे पर्यटनस्थळ उभारले जाईल. मुनावळे येथील आंतरराष्ट्रीय जलपर्यटन केंद्रासाठी सर्व परवानग्या घेतल्या जातील. विनापरवाना कोणतेही काम केले जाणार नाही. राज्यातील बारा गड किल्ल्यांचा समावेश युनेस्कोच्या यादीमध्ये झाला आहे. त्यामुळे राज्यातील सर्वच गड किल्ल्यांचे संरक्षण हे सरकार करेल. मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील स्मारक आमचे सरकार पूर्ण करेल. याविषयी खासदार उदयनराजे यांनी व्यक्त केलेले मत या त्यांच्या भावना आहेत, असेही शिंदे म्हणाले. मला गाव आहे म्हणून मी गावी येतो. मला शेती आहे म्हणून मी शेतात जातो. त्यांच्याकडे गावच नाही म्हणून ते लंडनला जातात. परदेशात फिरायला जातात. त्यांना स्वतःचे गावच नाही. त्यांना गावाचं महत्त्व काय कळणार. शिवसेना आणि भाजपची वैचारिक युती आहे. ही युती तोडण्याचे पाप त्यांनी केले होते. मुळात बाळासाहेबांनीच शिवसेना आणि भाजपाची युती केली होती. ती अविचाराने त्यांनी तोडली होती. ती युती आम्ही पुन्हा केली. बाळासाहेबांनी जे जे विचार देशाच्या संरक्षणासाठी आणि समाज व्यवस्थेसाठी मांडलेले होते ते सगळे मुद्दे, विचार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी प्रत्यक्षात आणले आहेत. त्यांनी राम मंदिर बांधले, ३७० कलम रद्द केले, असे अनेक निर्णय जे बाळासाहेबांना अपेक्षित होते ते भाजपाचे नेतृत्वाने घेतले आहेत. त्यामुळे आम्ही मूळ युती बरोबर गेलो आहोत.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, २०१९ मध्ये स्वतःचा वैयक्तिक स्वार्थ खुर्चीसाठी बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्व आणि विचार सोडले.

# अतिरेक्यांपेक्षा जास्त गद्दार भारतात!

## जोपर्यंत भगवा फडकणार, तोपर्यंतच हिंदू सुरक्षित राहणार



### जन नियंत्रण कायदा लागू व्हावा

त्यासाठी मुस्लीम जन नियंत्रण कायदा लागू व्हावा, अशी मागणीही त्यांनी केली.यावेळी बोलताना मंत्री नितेश राणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेने सर्वांना एक सारखा न्याय दिला आहे. त्यामुळे घटना मान्य करायला हवी, असे मत व्यक्त केले. मात्र याचवेळी, देशात जोपर्यंत भगवा फडकणार.

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या नेतृत्वाखाली हिंदुत्ववादी सरकार आहे. राज्यात हिंदूंवर उचलले जाणारे हात कापून काढावे लागतील. औरंगजेबाच्या पिलावळीकडून आजही प्राचीन हिंदू मंदिरांना धोका आहे. पाकिस्तानात जेवढे अतिरेकी नाहीत, तेवढे गद्दार भारतात आहेत, असे वादग्रस्त वक्तव्य भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी केले आहे.**

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे आयोजित हिंदू विराट सभेत पडळकर बोलत होते. एरव्ही, सामाजिक तेढ निर्माण करणारी विधाने करण्यात अग्रेसर राहिलेले मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे हे या सभेस उपस्थित होते. परंतु भाषणात आमदार पडळकर यांनी राणे यांना मागे टाकल्याचे दिसून आले.आमदार पडळकर यांनी आपल्या भाषणात नितेश राणे यांचे कौतुक केले. ते खरे डॉन आहेत.

वाघाच्या पोटी वाघच जन्माला येतो, असे ते म्हणाले. मुस्लीम समाज आता काँग्रेस पक्षालाही मानत नाही. इंग्रजांपेक्षा हे वाईट लोक आहेत. परंतु हे काँग्रेसलाही कळले नाही, असेही विधान त्यांनी केले. मुस्लीम समाजाला लोकसंख्या नियंत्रणाचे कोणतेही गांभीर्य नाही. त्यासाठी मुस्लीम जन नियंत्रण कायदा लागू व्हावा, अशी मागणीही त्यांनी केली.यावेळी बोलताना मंत्री नितेश राणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेने सर्वांना एक सारखा न्याय दिला आहे. त्यामुळे घटना मान्य करायला हवी, असे मत व्यक्त केले. मात्र याचवेळी, देशात जोपर्यंत भगवा फडकणार, तोपर्यंतच हिंदू सुरक्षित राहणार, असे विधान त्यांनी केले. या सभेत अक्कलकोटचे आमदार तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, कर्नाटकातील आमदार बसवनगौडा पाटील आदींनीही जहाल शब्दात हिंदुत्वाचा पुरस्कार केला.अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे आयोजित हिंदू विराट सभेत पडळकर बोलत होते. एरव्ही, सामाजिक तेढ निर्माण करणारी विधाने करण्यात अग्रेसर राहिलेले मत्स्य व्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे हे या सभेस उपस्थित होते. परंतु भाषणात आमदार पडळकर यांनी राणे यांना मागे टाकल्याचे दिसून आले. आमदार पडळकर यांनी आपल्या भाषणात नितेश राणे यांचे कौतुक केले. ते खरे डॉन आहेत. वाघाच्या पोटी वाघच जन्माला येतो, असे ते म्हणाले. मुस्लीम समाज आता काँग्रेस पक्षालाही मानत नाही. इंग्रजांपेक्षा हे वाईट लोक आहेत. परंतु हे काँग्रेसलाही कळले नाही, असेही विधान त्यांनी केले. मुस्लीम समाजाला लोकसंख्या नियंत्रणाचे कोणतेही गांभीर्य नाही.

# 50 टक्के भारतीयांचा व्हिसा रद्द!

## परराष्ट्र डॉ.एस.जयशंकर या प्रकरणाची दखल घेणार का?

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने ज्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द केले आहेत किंवा स्टुडंट अँड एक्सचेंज व्हिजिटर इन्फॉर्मेशन सिस्टममधून नोंदणी रद्द केली आहे, त्यापैकी सुमारे ५० टक्के विद्यार्थी भारतातील आहेत.**



### 1,024 विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द

म्हणजेच ते पदवीधर झाले असून, अमेरिकेत नोकरी करत आहेत.ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग एफ १ व्हिसावर अमेरिकेत असलेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना १२ महिन्यांपर्यंत काम करण्याची परवानगी मिळते. यानंतर जे विद्यार्थी विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रात काम करतात त्यांना व्हिसामध्ये आणखी २४ महिन्यांनी मुदतवाढ मिळते.असोसिएटेड प्रेसच्या वृत्तानुसार, मार्चअखेरपासून १६० विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील किमान १,०२४ विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत किंवा त्यांचा कायदेशीर दर्जा रद्द करण्यात आला आहे. यामुळे या विद्यार्थ्यांना अटकेचा आणि त्यांना हद्दपार करण्याचा धोका निर्माण झाला आहे.

अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनने विद्यार्थी, वकील आणि विद्यापीठ कर्मचाऱ्यांकडून या प्रकरणांवर ३२७ अहवाल गोळा केले आहेत. यातून ही माहिती समोर आली आहे. व्हिसा रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये १४ टक्के विद्यार्थी चीनचे आहेत. व्हिसा रद्द करण्यात आलेल्या इतरांमध्ये दक्षिण कोरिया, नेपाळ आणि बांगलादेशच्या विद्यांर्थ्यांचाही समावेश आहे.ओपन डोअर्सच्या आकडेवारीनुसार, २०२३-२४ मध्ये अमेरिकेत परदेशातील सर्वाधिक विद्यार्थी भारतातील आहेत. २०२३-२४ मध्ये ११,२६,६९० आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी ३,३१,६०२ विद्यार्थी भारतातील होते (एकूण आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी २९%). त्यानंतर २.७७ लाख चिनी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनच्या अहवालात असेही म्हटले आहे की, ज्या विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत, त्यापैकी ५० टक्के विद्यार्थी ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंगवर होते.

म्हणजेच ते पदवीधर झाले असून, अमेरिकेत नोकरी करत आहेत.ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग एफ १ व्हिसावर अमेरिकेत असलेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना १२ महिन्यांपर्यंत काम करण्याची परवानगी मिळते. यानंतर जे विद्यार्थी विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रात काम करतात त्यांना व्हिसामध्ये आणखी २४ महिन्यांनी मुदतवाढ मिळते. असोसिएटेड प्रेसच्या वृत्तानुसार, मार्चअखेरपासून १६० विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील किमान १,०२४ विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत किंवा त्यांचा कायदेशीर दर्जा रद्द करण्यात आला आहे. यामुळे या विद्यार्थ्यांना अटकेचा आणि त्यांना हद्दपार करण्याचा धोका निर्माण झाला आहे.दरम्यान अमेरिकेने विद्यार्थी व्हिसा रद्द केलेल्यांमध्ये ५० टक्के भारतीय विद्यार्थ्यांचा समावेश असल्याचे समोर आल्यानंतर काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केंद्र सरकारला सवाल केला आहे.जयराम रमेश यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, "अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनने काल जारी केलेले पत्रक भारतासाठी चिंतेचा विषय आहे. त्यांनी आतापर्यंत गोळा केलेल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या व्हिसा रद्द करण्याच्या ३२७ प्रकरणांपैकी ५०% विद्यार्थी भारतीय आहेत. व्हिसा रद्द करण्याची कारणे अस्पष्ट आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीती आणि धास्ती सतत वाढत आहे. परराष्ट्र डॉ.एस.जयशंकर तुम्ही या प्रकरणाची दखल घेणार आहात का?अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनने विद्यार्थी, वकील आणि विद्यापीठ कर्मचाऱ्यांकडून या प्रकरणांवर ३२७ अहवाल गोळा केले आहेत. यातून ही माहिती समोर आली आहे. व्हिसा रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये १४ टक्के विद्यार्थी चीनचे आहेत. व्हिसा रद्द करण्यात आलेल्या इतरांमध्ये दक्षिण कोरिया, नेपाळ आणि बांगलादेशच्या विद्यांर्थ्यांचाही समावेश आहे.ओपन डोअर्सच्या आकडेवारीनुसार, २०२३-२४ मध्ये अमेरिकेत परदेशातील सर्वाधिक विद्यार्थी भारतातील आहेत. २०२३-२४ मध्ये ११,२६,६९० आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी ३,३१,६०२ विद्यार्थी भारतातील होते (एकूण आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांपैकी २९%). त्यानंतर २.७७ लाख चिनी विद्यार्थ्यांचा समावेश आहे. अमेरिकन इमिग्रेशन लॉयर्स असोसिएशनच्या अहवालात असेही म्हटले आहे की, ज्या विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत, त्यापैकी ५० टक्के विद्यार्थी ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंगवर होते.

---

# आपण कोणत्याही ब्रँड्सच्या नावाचा उल्लेख केला नाही!

## रुह अफजा वादानंतर रामदेव बाबांकडून 'सरबत जिहाद'चे समर्थन

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बाबा रामदेव यांनी काही दिवसांपूर्वी पतंजलीच्या गुलाब सरबत या नव्या उत्पादनाची जाहिरात करत असतान बाजारात उपलब्ध असलेल्या सरबताच्या ब्रँड्सवर टीका केली होती. या ब्रँड्सच्या वस्तू घेतल्यामुळे त्यातून होणारा नफा मशिदी आणि मदरशांकडे जातो, असा दावा करताना त्यांनी यास 'सरबत जिहाद' असे नाव दिले होते. या विषयावर आता वाद उफाळल्यानंतर बाबा रामदेव यांनी आपल्या विधानाचे समर्थन केले आहे. तसेच आपण कोणत्याही ब्रँड्सच्या नावाचा उल्लेख केला नव्हता, असेही स्पष्टीकरण दिले.**



### ब्रँडच्या वस्तू विकून नफा मिळतो

पतंजलीच्या उत्पादनांचा खप वाढविण्यासाठी रामदेव बाबा सांप्रदायिक भावना भडकविण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप त्यांच्यावर केला गेला. दिग्विजय सिंह पुढे म्हणाले की, धर्म आणि राष्ट्रवादाचा वापर करून रामदेव बाबा यांनी एक मोठे व्यावसायिक साम्राज्य उभे केले.

बाबा रामदेव म्हणाले, "मी कुणाचेही नाव घेतली नव्हते. तरीही रूह अफ्जाला समर्थन करणाऱ्या लोकांनी सरबत जिहाद शब्द ओढवून घेतला. याचा अर्थ ते जिहाद करत आहेत, हे त्यांना मान्य आहे."ते पुढे म्हणाले, "जर त्यांची निष्ठा इस्लामशी असेल आणि त्यांना मदरशे आणि मशिदी बांधण्यात रस असेल तर त्यांनी आनंद मानायला हवा. तथापि, सनातन्यांनी हे समजून घेतले पाहिजे की, ते कुणाच्या बाजूने आहेत. सनातनचा गौरव कुणामुळे वाढतोय, हे लक्षात घेतले पाहिजे. सरबत जिहाद होतो आहे, हे मी पुन्हा सांगतो.

"बाबा रामदेव यांनी पतंजलीच्या उत्पादनाची जाहिरात करण्यासाठी फेसबुक पेजवर एक व्हिडीओ पोस्ट केला होता. या व्हिडीओमध्ये त्यांनी बाजारात उपलब्ध असलेल्या काही सरबताच्या ब्रँडवर टीका केली होती. या ब्रँड्च्या वस्तू विकून जो नफा मिळतो, तो मशीद आणि मदरशे उभारण्यासाठी वापरला जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यांच्या विधानावर काँग्रेस नेते दिग्विजय सिंह यांनी आक्षेप घेतला. तसेच भोपाळ मधील टीटी नगर पोलीस ठाण्यात जाऊन रामदेव बाबा यांच्या विरोधात धार्मिक द्वेष पसरविल्याच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली.मध्य प्रदेशचे राज्यसभा खासदार यांनी त्यांच्या तक्रारीत भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम १९६ (१) (अ) आणि २९९ नुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलमही दाखल करण्याची मागणी केली आहे. रामदेव बाबा यांनी पतंजलीच्या गुलाब सरबतची जाहिरात करत असताना रूह अफ्जा ब्रँडवर नाहक टीका केली, असा आरोप करण्यात आला. रामदेव बाबा यांच्या अधिकृत सोशल मिडिया हँडलवर सदर व्हिडीओ अपलोड करण्यात आला आहे.

## आनंदाला वयाचं बंधन नाही!

जुनी गाणी म्हटलं आजही प्रेक्षकांच्या लक्षात राहणारी आणि तितकीच लोकप्रिय. आजही जुनी गाणी रसिकांच्या ओठावर असतात. त्यातच 70 च्या दशकातील गाण्यामध्ये एक वेगळेपणा होता. एक गोडवा होता. त्यामुळे आजही त्या काळातील गाणी लोकांमध्ये खूप लोकप्रिय आहेत. असचं त्या काळातील एक प्रसिद्ध गाणं म्हणजे 'कोई शहरी बाबू दिल लहरी बाबू'. आजही हे गाणं अनेकांना तोंड पाठ असेल. बॉलिवूडमधील ज्येष्ठ अभिनेक्षी मुमताज आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या डान्सचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये मुमताज आणि आशा भोसले या दोघी "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" (गाण्यावर थिरकताना दिसत आहेत. दोघींच्या या व्हिडीओ नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. मुमताज यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये त्या आशा भोसले यांच्यासोबत "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" या गाण्यावर डान्स करताना दिसत आहेत. व्हिडीओमध्ये मुमताज या आशा भोसले यांना डान्स स्टेप्स सांगताना दिसत आहेत. मुमताज यांनी शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये त्या बॅक आऊटफिटमध्ये दिसत आहेत. "कोई सहरी बाबू दिल लहरी बाबू" हे गाणे लोफर या चित्रपटामधील आहे. हे गाणे लक्ष्मीकांत- प्यारेलाल या जोडीने लिहिले आहे आणि आशा भोसले यांनी हे गायले आहे. आजही लोक हे गाण आवडीनं ऐकतात. भीमसिंह दिग्दर्शित लोफर हा चित्रपट 1973 मध्ये रिलीज झाला होता. धर्मेंद्र आणि मुमताज या चित्रपटात मुख्य भूमिकेत होते तर ओम प्रकाश, प्रेमनाथ आणि के एन सिंग यांनी देखील या चित्रपटात काम केलं होतं. "कोई सहरी

## राणी मुखर्जी पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला

बॉलीवूड अभिनेत्री राणी मुखर्जी पुन्हा एकदा वरिष्ठ निरीक्षक शिवानी शिवाजी रॉय या भूमिकेत झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. शुक्रवारी 'मर्दानी ३' चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना पुन्हा एकदा राणी मुखर्जीचा भारदस्त अभिनय पाहता येणार आहे.'मर्दानी २' रिलीजच्या वर्धापन दिनानिमित्त यश राज फिल्म्सने 'मर्दानी ३'ची घोषणा करत एक पोस्टर शेअर केलं आहे. तसेच कॅप्शनमध्ये लिहिलं, "प्रतीक्षा संपली! 'मर्दानी ३'मध्ये राणी मुखर्जी पुन्हा एकदा शिवानी शिवाजी रॉय या भूमिकेत दिसणार आहे. २०२६ मध्ये चित्रपटगृहांत." राणी मुखर्जीच्या 'मर्दानी ३' चित्रपटाची चाहते गेल्या अनेक दिवसांपासून वाट पाहत आहेत. हा चित्रपट २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याची नेमकी तारीख अद्याप समोर आलेली नाही.'मर्दानी ३' चित्रपटाचे दिग्दर्शन अभिराज मीनावाला करणार आहे, तर निर्मिती आदित्य चोपडा करणार आहे. अभिनेत्री राणी मुखर्जीने यावर तिची प्रतिक्रिया दिली आहे. तिने म्हटलं, "मला ही घोषणा करताना फार आनंद होत आहे की, आम्ही २०२५ मध्ये 'मर्दानी ३' चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करत आहोत. पोलिसांच्या वर्दीत अशा भूमिका साकारणे प्रत्येक कलाकारासाठी एक अभिमानाची गोष्ट असते, मझ्यासाठीदेखील ही फार मोठी गर्वाची गोष्ट आहे. आजवर मोठ्या हिमतीने सर्वांचे रक्षण करताना बलिदान दिलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांसाठी ही एक श्रद्धांजली आहे." "मागच्या दोन चित्रपटांच्या तुलनेत 'मर्दानी ३' फार खास असणार आहे.

## जान्हवी शिखरला करतीये डेट?



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री जान्हवी कपूर (JANHVI KAPOOR) ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. नुकतीच जान्हवी ही महाकाल देवाच्या दर्शनासाठी उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरात गेली होती. महाकालेश्वर मंदिरातील जान्हवीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामध्ये ते भजन म्हणताना दिसत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या महाकालेश्वर मंदिरातील व्हिडीओमध्ये दिसत आहे की, जान्हवी कपूर ही सुशील कुमार शिंदे यांचा नातू शिखर पहाडियासोबत महाकाल देवाच्या भक्तीत तल्लीन झालेली दिसत आहे. जान्हवी आणि शिखर यांच्यासोबतच दिग्दर्शक ॲटलीनं देखील महाकाल देवाचे दर्शन घेतले आहे. काही दिवसांपूर्वी जान्हवी आणि शिखरने तिरुपती बालाजीचे दर्शनही घेतले होते. शिखर पहाडिया हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांचा नातू आहे. शिखर हा स्मृती शिंदे आणि संजय पहाडिया यांचा मुलगा आहे. जान्हवीचं नाव गेल्या काही दिवसांपासून शिखरसोबत जोडलं जात आहे. शिखर आणि जान्हवी यांनी त्यांच्या चाहत्यांना त्यांच्या नात्याबाबत अजून कोणतीही माहिती दिलेली नाही. पण विविध कार्यक्रमांमध्ये शिखर आणि जान्हवी यांना एकत्र स्पॉट केलं जातं. त्यामुळे जान्हवी आणि शिखर यांच्या नात्याबाबत सोशल मीडियावर चर्चा होत असते. गुंजन सक्सेना, घोस्ट स्टोरीज, दोस्ताना 2, रुही यांसारख्या हिट चित्रपटांमध्ये जान्हवीनं काम केलं आहे. मिली या चित्रपटातील अभिनयाचं अनेकांनी कौतुक केलं. जान्हवीच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत असतात. ती लवकरच ज्युनियर एनटीआरसोबत 'देवारा' या चित्रपटात दिसणार आहे.

## मराठमोळी राधिका आपटे झाली आई

मराठमोळी बॉलीवूड अभिनेत्री राधिका आपटे आई झाली आहे. राधिकाने तिच्या बाळाबरोबरचा फोटो शेअर करून चाहत्यांशी ही आनंदाची बातमी शेअर केली आहे. राधिकाने तिच्या बाळाची पहिली झलक दाखवली आहे. राधिकाचं बाळ एका आठवड्याचं झालं आहे. राधिका आपटे लग्नानंतर १२ वर्षांनी आई झाली आहे. दोन महिन्यापूर्वी तिने बेबी बंप फ्लॉंट करून तिच्या घरी नवीन सदस्याचं आगमन होणार असल्याची गुड न्यूज दिली होती. आता तिने बाळाबरोबरचा फोटो शेअर करत प्रसूतीनंतर ती कामावर परतली आहे, अशी माहिती दिली. राधिकाने तिला मुलगा झाला की मुलगी याबाबत सांगितलेलं नाही.राधिकाने शेअर केलेल्या फोटोमध्ये ती लॅपटॉपसमोर बसलेली दिसत आहे. तर तिच्या कुशीत बाळ आहे. तिने दिलेल्या कॅप्शनुसार तिचं बाळ एका आठवड्याचं झालं आहे. एका आठवड्याच्या बाळाच्या जन्मानंतर पहिली वर्क मीटिंग अशा आशयाचं कॅप्शन देत राधिकाने फोटो पोस्ट केला आहे. राधिका तिचं वैयक्तिक आयुष्य सोशल मीडियापासून दूर ठेवते. राधिकाने तिच्या लग्नाची माहितीही बराच काळ लपवून ठेवली होती. तिने वर्षभर डेट केल्यावर २०१२ मध्ये ब्रिटीश व्हायोलिन वादक आणि लोकप्रिय संगीतकार बेनेडिक्ट टेलरशी लग्नगाठ बांधली होती. आता राधिका व बेनेडिक्ट दोघेही एका गोंडस बाळाचे आई-बाबा झाले आहेत.मराठमोळी बॉलीवूड अभिनेत्री राधिका आपटे आई झाली आहे. राधिकाने तिच्या बाळाबरोबरचा फोटो शेअर करून चाहत्यांशी ही आनंदाची बातमी शेअर केली आहे. राधिकाने तिच्या बाळाची पहिली झलक दाखवली आहे. राधिकाचं बाळ एका आठवड्याचं झालं आहे. राधिका आपटे लग्नानंतर १२ वर्षांनी आई झाली आहे. दोन महिन्यापूर्वी तिने बेबी बंप फ्लॉंट करून तिच्या घरी नवीन सदस्याचं आगमन होणार असल्याची गुड न्यूज दिली होती. आता तिने बाळाबरोबरचा फोटो शेअर करत प्रसूतीनंतर ती कामावर परतली आहे, अशी माहिती दिली.



## निया शर्माच्या समोर तर उर्फी पण फेल



उर्फी जावेद ही तिच्या अतरंगी फॅशनमुळे नेहमी चर्चेत असते. उर्फीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. अशातच आता आणखी एका अभिनेत्रीच्या हटके आऊटफिटची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. या अभिनेत्रीचे हटके लूकमधील फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. जाणून घेऊयात या अभिनेत्रीबद्दल... अभिनेत्री निया शर्मानं खास लूकमध्ये एका बर्थडे पार्टीला हजेरी लावली. नियाच्या या लूकची चर्चा सोशल मीडियावर होत आहे. नियाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामध्ये ती ब्लॅक आऊटफिट, हातात ब्लॅक बॅग आणि मोकळे केस अशा लूकमध्ये दिसत आहे. तिच्या या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. निया शर्माच्या सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो आणि व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी कमेंट्स केल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "हिच्या समोर तर उर्फी पण फेल" तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असाच ट्रेलर उर्फीनं घातला होता, तेव्हा तिला अनेकांनी ट्रोल केलं होतं." निया शर्मा अनेक मालिकांमध्ये काम केलं आहे. निया शर्मानं 'काली- एक अग्निपरीक्षा' या 2010 मधील मालिकेमधून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं. 'जमाई राजा' या मालिकेमुळे तिला विशेष लोकप्रियता मिळाली.'खतरों के खिलाडी' आणि 'झलक दिखला जा' या कार्यक्रमांमध्ये देखील तिनं सहभाग घेतला होता. निया ही सोशल मीडियावर विविध लूकमधील फोटो शेअर करत असते. तिच्या सोशल मीडियावरील फोटो आणि व्हिडीओवर नेटकरी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत असतात.

# नेहल वढेराची दमदार खेळी!

## छोटेखानी लढतीत पंजाबची बंगळुरूवर सरशी

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पावसामुळे बाधित लढतीत पंजाब किंग्ज संघाने अग्रेसर असल्याचं सिद्ध करत बंगळुरूवर ५ विकेट्सनी विजय मिळवला. पावसामुळे हा सामना १४ षटकांचा खेळवण्यात आला. पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यरने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. आततायी आक्रमण करणारे आरसीबीचे फलंदाज पंजाबच्या गोलंदाजांसमोर निरुत्तर ठरले. ६३/९ अशा स्थितीतून टीम डेव्हिडने बंगळुरूला सावरलं. डेव्हिडने ५० धावांची खेळी केली आणि बंगळुरूने ९५ धावांची मजल मारली. प्रत्युत्तरादाखल खेळताना पंजाबनेही नियमित अंतरात विकेट्स गमावल्या.**



छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना प्रभसिमरन सिंग आणि प्रियांश आर्य यांनी २२ धावांची सलामी दिली. भुवनेश्वर कुमारने प्रभसिमरनचं आक्रमण थोपवलं. पाठोपाठ प्रियांश आर्यला जोश हेझलवूडने तंबूत परतावलं. श्रेयस अय्यर आणि जोश इंगलिस यांनी पडझड रोखत डाव सावरला. खेळपट्टीवर स्थिरावलाय असं वाटत असतानाच जोश हेझलवूडचा चेंडू स्लाईस करण्याच्या प्रयत्नात श्रेयस अय्यर बाद झाला. त्याने ७ धावा केल्या. दोन चेंडूंनंतर जोश इंगलिसही हेझलवूडचीच शिकार ठरला. यानंतर नेहल वढेराने सामन्याची सूत्रं हाती घेतली. फिरकीपटू सुयश शर्माच्या गोलंदाजीवर चौकार, षटकार वसूल करत त्याने धावगतीचं दडपण कमी केलं. मोक्याच्या क्षणी शशांक सिंगला भुवनेश्वर कुमारने बाद केलं.कमी षटकांच्या सामन्यात कशी बॅटिंग करू नये याचा नमुना सादर करत आरसीबीने पंजाबच्या गोलंदाजांपुढे लोटांगण घातलं. डावखुऱ्या अर्शदीप सिंगला मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न जोश इंगलिसच्या ग्लोव्ह्जमध्ये जाऊन विसावला. सॉल्टचा कित्ता गिरवत कोहलीनेही अर्शदीपच्या गोलंदाजीवर आक्रमण केलं. पण ते अपयशी ठरलं. या दोघांप्रमाणेच लायम लिव्हिंगस्टोनने झेव्हियर बार्टलेटच्या गोलंदाजीवर आक्रमण केलं. पण तोही अपयशी ठरला. फिरकीपटू युझवेंद्र चहलने जितेश शर्माला माघारी धाडलं. कृणाल पंड्या मार्को यान्सनच्या गोलंदाजीवर झेल देऊन तंबूत परतला. खेळपट्टीवर स्थिरावलेल्या रजत पाटीदारलाही चहलनेच फसवलं. त्याने २३ धावांची खेळी केली. लिव्हिंगस्टोनच्या जागी इम्पॅक्ट प्लेयर म्हणून आलेला मनोज भडागेही एक धाव करून तंबूत परतला. भुवनेश्वर कुमारने ८ धावा करत प्रतिकार केला पण हरप्रीत ब्रारला मोठा फटका मारण्याचा त्याचा प्रयत्न बार्टलेटच्या हातात गेला. पुढच्याच चेंडूवर ब्रारने यश दयाळला पायचीत केलं. ६३/९ अशा स्थितीतून टीम डेव्हिडने आरसीबीला बाहेर काढलं. डेव्हिडने पंजाबच्या गोलंदाजांवर जोरदार आक्रमण करत चौकार, षटकार वसूल केले. त्याने हेझलवूडला स्ट्राईकही दिला नाही. डेव्हिडने २६ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ५० धावांची खेळी केली. डेव्हिडच्या अर्धशतकाच्या बळावर आरसीबीने ९५ धावांची मजल मारली. पंजाबतर्फे अर्शदीप सिंग, मार्को यान्सन, युझवेंद्र चहल आणि हरप्रीत ब्रार यांनी प्रत्येकी २ विकेट्स पटकावल्या.छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना प्रभसिमरन सिंग आणि प्रियांश आर्य यांनी २२ धावांची सलामी दिली.

### डेव्हिडने 50 धावांची खेळी केली

भुवनेश्वर कुमारने प्रभसिमरनचं आक्रमण थोपवलं. पाठोपाठ प्रियांश आर्यला जोश हेझलवूडने तंबूत परतावलं. श्रेयस अय्यर आणि जोश इंगलिस यांनी पडझड रोखत डाव सावरला. खेळपट्टीवर स्थिरावलाय असं वाटत असतानाच जोश हेझलवूडचा चेंडू स्लाईस करण्याच्या प्रयत्नात श्रेयस अय्यर बाद झाला. त्याने ७ धावा केल्या. दोन चेंडूंनंतर जोश इंगलिसही हेझलवूडचीच शिकार ठरला. यानंतर नेहल वढेराने सामन्याची सूत्रं हाती घेतली. फिरकीपटू सुयश शर्माच्या गोलंदाजीवर चौकार, षटकार वसूल करत त्याने धावगतीचं दडपण कमी केलं. मोक्याच्या क्षणी शशांक सिंगला भुवनेश्वर कुमारने बाद केलं.कमी षटकांच्या सामन्यात कशी बॅटिंग करू नये याचा नमुना सादर करत आरसीबीने पंजाबच्या गोलंदाजांपुढे लोटांगण घातलं. डावखुऱ्या अर्शदीप सिंगला मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न जोश इंगलिसच्या ग्लोव्ह्जमध्ये जाऊन विसावला.

# आयपीएलमध्ये कोण निवडतात सामनावीर?

## आयपीएलमध्ये काय असते समालोचक आणि पंचांची भूमिका?

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज।

**आयपीएल २०२५ चा उत्साह शिगेला पोहोचला असून, यंदाच्या हंगामात आतापर्यंत ३० हून अधिक सामने खेळले गेले आहेत. या प्रत्येक सामन्यात कोणत्या ना कोणत्या खेळाडूने आपल्या खास कामगिरीने खेळाची दिशा बदलत आपल्या संघाला विजय मिळवून दिले आहेत. दरम्यान आयपीएलच्या २९ व्या सामन्यातही असेच दृश्य पाहायला मिळाले.**




१४ एप्रिल रोजी लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात धोनीने अवघ्या ११ चेंडूत २६ धावांची खेळी केली. ज्यात एक षटकार आणि चार चौकारांचा समावेश होता. त्याच्या या वादळी खेळीच्या जोरावर चेन्नई सुपर किंग्जने हा सामना ५ फलंदाज राखून जिंकला. सामन्यातील या कामगिरीसाठी धोनीला सामनावीराचा पुरस्कार मिळाला.दरम्यान सामनावीराच्या पुरस्कारासाठी धोनीचे नाव जाहीर झाल्यानंतर, तो म्हणाला, “सामनावीराचा पुरस्कार मला मिळाला याचे आश्चर्य वाटते. हा पुरस्कार तर शिवम दुबेला मिळायला पाहिजे होता.”सामनावीराच्या पुरस्काराच्या बाबतीत धोनीने केलेल्या या वक्तव्याची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे. याचबरोबर चाहत्यांमध्ये पुरस्कार निवडीवरून सोशल मीडियावर वादही सुरू आहेत. अशात, असा प्रश्न उद्भवतो की, आयपीएलमध्ये सामनावीर कोण निवडतो? हा फक्त आकड्यांचा खेळ आहे की त्यामागे आणखी काही गणित असते?आयपीएलमधील सामनावीराची निवड समालोचक पॅनेलकडून केली जाते. प्रत्येक सामन्यादरम्यान समालोचन करणारे तज्ज्ञ ही जबाबदारी पार पाडतात. हे पॅनेल ब्रॉडकास्टरद्वारे तयार केले जाते, ज्यामध्ये माजी खेळाडू, प्रशिक्षक आणि अनुभवी विश्लेषकांचा समावेश असतो. समालोचक सामना सुरू असताना केवळ समालोच करत नसतात, तर त्यांच्याकडे असलेल्या सामना विश्लेषण पथकाच्या मदतीने आकडेवारीच्या आधारे प्रत्येक क्षणाची परिस्थिती समजावून सांगतात.दरम्यान, सामनावीर निवडताना समालोचकांचे हे पॅनेल, कोणता खेळाडू कोणत्या वेळी मैदानावर आला?दबावाखाली कोणी चांगली कामगिरी केली? कोणता क्षण गेम चेंजर ठरला? याचा विचारही करतात. समालोचकांना हे सर्व तपशील माहित असतात.

### कधीकधी मतभेद उद्भवतात

परंतु समालोचकांचे पॅनेल सामन्याच्या निकालावर सर्वात जास्त प्रभाव पाडणाऱ्या खेळाडूलाच सामनावीर म्हणून निवडतात.जरी सामनावीर निवडण्याची पद्धत अनुभवावर आधारित असली तरी, कधीकधी वाद किंवा मतभेद उद्भवतात. बऱ्याचदा चाहत्यांना असे वाटते की, हा पुरस्कार दुसऱ्या एखाद्या खेळाडूला मिळायला हवा होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

।शनिवार।

।दि. 19 एप्रिल 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




## 7 ते 8 किमी अंतरापर्यंत वाहनांच्या रांगा

# पुणे मुंबई महामार्गावर अभूतपूर्व वाहतूक कोंडी!

### प्रवाशांचा 12 तासाहून अधिक कालावधी वाहतूक कोंडीमध्ये

।लोणावळा ।प्रतिनिधी : महाईन्यूज।

**सलग सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात पर्यटक घराबाहेर पडल्यामुळे मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर शुक्रवारी पहाटेपासून प्रचंड वाहतूक कोंडी झाली . सलग तीन दिवस सुट्ट्यामुळे मुंबई, ठाणे, नवीमुंबई येथून मोठ्या प्रमाणात नागरिक बाहेर निघाले आहेत. तर काही ठिकाणी शाळांच्या सुट्ट्या सुरु झाल्या असून अनेकजण गावी निघाले असल्याने वाहने मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आली आहेत. खंडाळा घाट परिसरामध्ये साधारणतः 7 ते 8 किलोमीटर पर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा केल्याने मुंबई पुणे महामार्गावरील वाहतूक व्यवस्था कोलमंडली. अक्षरशा: वाहनांना 12 तासाहून अधिक कालावधी वाहतूक कोंडीमध्ये घालवावा लागला.**



एप्रिल महिन्याचा हा ''विकेंड' सलग तीन दिवस सुट्ट्या घेऊन आल. आज शुक्रवार गुड फ्रायडे च्या सुट्टीला जोडूनच शनिवार व रविवार आल्याने या सलग तीन दिवस सुट्ट्यांच्या निमित्त पर्यटन स्थळांवर जाण्याचा चंग बांधत मोठ्या प्रमाणात पर्यटक खाजगी वाहनांमधून घराबाहेर पडले. वाहतूक कोंडी पासून सुटका मिळावी याकरिता पहाटेच पर्यटक घराबाहेर पडले. मात्र मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर त्यांना खंडाळा ते खोपोली दरम्यान वाहतूक कोंडी मध्ये अडकून पडावे लागले आहे. खंडाळा ते खोपोली दरम्यान मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आहे. शुक्रवारी दिवसभर वाहतूक कोंडी पाहायला मिळाली. तब्बल 12 तासाहून अधिक काळ पर्यटकांना वाहतूक कोंडी अनुभवाला मिळाली. खंडाळा टनेलमधून दोन्ही मार्गांवर मुंबईकडे येणाऱ्या मार्गांवर व पुण्याकडे जाणाऱ्या मार्गांवर एकाच मार्गाची पुण्याकडे जाणारी वाहतूक सुरु होती. खंडाळ्यातून मुंबईकडे येणारी वाहतूक एक्सप्रेस वे वर थांबवण्यात आल्याने खंडाळा परिसरात वाहनांच्या रांगा पाहायला मिळत होत्या. दुपार नंतर खंडाळा टनेलमधून दोन्ही मार्गांवर पुण्याकडे जाणारी वाहतूक सुरु केली. तर मुंबईकडे जाणारी वाहतूक रोखून वाहतूक कोंडी दूर करण्याचा प्रयत्न पोलिसांनीकेला. सकाळपासून पोलीस महामार्गावर उपस्थित होते.


ADMISSION OPEN
From 21st April 2025
1 Hour /day
Monday to Saturday
Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation
Batch
"यत् भावो – तत् भवति"
Our Courses
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> 'C ++' Language
> Basic Java
> Basic Tally
> M. S. Office
Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
2025-26
ADMISSIONS
OPEN
PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION
50
FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS
Contact Us Now
86687 55826
98232 31705
Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7
STAR
RANKING
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Website : www.http://mastermindglobalschool.com


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


KAMALA Education Society
KAMALA EDUCATION SOCIETY'S
PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT
AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167
Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University
ADMISSIONS OPEN
Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)
BBA
Bachelor of Business Administration
BCA
Bachelor of Computer Applications
Highlights:
Advanced Industrial and Research Learning
Proven Track Record of Placements
Mentoring and Seed Funds for Startups
Skill Development and Certification Courses
Live Industrial Projects
Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
Govt. and Management Scholarships
State of the Art infrastructure
ICT enabled classrooms
Eligibility: Passed HSC Examination with any stream
Call for more details:
BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556
BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895
www.pibmpune.org.in
Scan QR code to know more

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

KAMALA Education Society

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more